महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०५ दि. २२/ ०६/ २०२०

**विषय : लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत वारसाहक्काची अमंलबजावणी पुढे चालू ठेवण्या बाबत.**

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३ दि.२५.०७.२००६.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. २८४ दि.०५.०४.२०१०.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३१७ दि.०९.११.२०१०.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४६५ दि.११.०७.२०१३.

श्री. लाड व पागे समितीने मेहतर, वाल्मीकी समाजाच्या शैक्षणीक, आर्थीक व सामाजीक उन्नतीसाठी तत्कालीन परिस्थितीचा विचार करता विशेष शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशीं / सुचनांचे काटेकोरपणे अवलोकन करून योग्य ती कार्यवाही करणे बाबतच्या सुचना प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३ दि. २५.०७.२००६ अन्वये या पुर्वीच दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने, महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करणेबाबत संदर्भीत प्रशासकीय परिपत्रक क्र. २८४ दि. ०५.०४.२०१०, प्रशासकीय परिपत्रक क्र. ३१७ दि. ०९.११.२०१० व प्रशासकीय परिपत्रक क्र. ४६५ दि. ११.०७.२०१३ अन्वये निर्देश दिलेले आहेत.

२. सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा शासन निर्णय क्र. सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे दि. १०.११.२०१५ हा रद्द केल्याने, सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. सफाई-२०१४/ प्र.क्र.०७/महामंडळे दि. २६.०२.२०१४ मधील सुचना पुन्हा लागु करणे, तसेच सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा शासन निर्णय क्र सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे दि. ११.०३.२०१६ व सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६-ब (सी) दि. १९.०४.२०१८ मधील सुचना/निर्देश अंगीकृत करणेबाबतची बाब विचाराधीन होती.

३. आता, संचालक मंडळाने **ठराव क्र. २०२८ दि. २६.०२.२०२०** अन्वये सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. सफाई-२०१४/प्र.क्र.०७/महामंडळे दि. २६.०२.२०१४ व शासन निर्णय क्र. सफाई-२०१५/ प्र.क्र.२६८/महामंडळे दि. ११.०३.२०१६ आणि सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६-ब (सी) दि. १९.०४.२०१८ अंगीकृत करणेकरीता मंजूरी प्रदान केलेली आहे. सोबत शासन परिपत्रक दि. २६.०२.२०१४, शासन निर्णय दि. ११.०३.२०१६ व शासन परिपत्रक दि. १९.०४.२०१८ ची प्रत माहितीस्तव जोडण्यात आलेली आहे.

४. तसेच, संचालक मंडळाने **ठराव क्र. २०२८ दि.२६.०२.२०२०** अन्वये शासन आदेशान्वये पारीत करण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व त्यापैकी खालील महत्वाच्या सूचनांकडे सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

अ) मेहतर व वाल्मीकी समाजासह अनुसूचीत जाती मधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा जवळच्या नातेवाईक यास सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. सदर योजनेचा लाभ हा फक्त सफाई कामगार म्हणून नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यापुरता मर्यादीत असेल.

ब)	सफाई कामगार म्हणून नियुक्त झालेल्या, तसेच सफाई कामगार म्हणून नियुक्त झाल्यानंतर वेतनगट-४ मधील इतर पदावर काम करणाऱ्या, सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या किंवा सेवेत असतांना निधन पावलेल्या व अशा प्रकरणी कर्मचारी सेवासमाप्त होईपर्यंत वेतनगट-४ मध्येच कार्यरत होते अशा कर्मचाऱ्यांना ही योजना लागू राहील.

क)	वारस / जवळचे नातेवाई यास नियुक्ती देतांना वेतनगट-४ मधील सफाई कर्मचारी या पदावर देण्यात यावी. सफाई कर्मचारी पदे उपलब्ध नसल्यास इतर वेतनगट-४ मधील पदांकरीता शैक्षणीक अर्हता विचारात घेऊन नियुक्ती देणेबाबतची कार्यवाही करावी. जर वेतनगट-४ मध्ये रिक्त पदे उपलब्ध नसल्यास वारसदाराची शैक्षणीक अर्हता विचारात घेऊन जास्तीत-जास्त वेतनगट-३ (मंडळस्तर सेवा जेष्ठता यादी) मधील रिक्त असणाऱ्या प्रवेशपदी (Entry Level Post) नियुक्तीबाबत विचार करावा. आवश्यकता भासल्यास म.रा.वि.वि.कं. म.चे वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम २००५ मधील नियम शिथील करावेत.

ड)	वारस व जवळचे नातेवाईक यांच्या व्याख्ये करीता प्रशासकीय परिपत्रक क्र. ४६५ दि. ११.०७.२०१३ चे सहपत्र तथा सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन परिपत्रक क्र सफाई-२०११/प्र.क्र.३२७/विघयो-२ दि. २१.१०.२०११ व सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. सफाई-२०१४/प्र.क्र.०७/महामंडळे दि. २६.०२.२०१४ हे पहावे.

इ)	सफाई कामगाराच्या शैक्षणीक, आर्थीक व सामाजीक उन्नतीसाठी शासनाने व कंपनीने या पुर्वी वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश / परिपत्रक / सुचनांची अंमलबजावणी करण्यास जे कर्मचारी / अधिकारी हेतुपुरस्पर टाळाटाळ, कुचराई करतील त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०९३ /६९७/१६-ब दि.१२.०६.१९९५ मधील निर्देशनांच्या अधिन राहुन म.रा.वि.वि.कं.म.चे कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील तरतुदींनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

५.	लाड पागे समितीच्या शिफारशी अंतर्गत द्यावयाच्या नियुक्ती प्रकरणी मुख्य कार्यालयातील मागासवर्ग कक्षाकडून मंडळ ठराव क्र. २०२८ दि. २६.०२.२०२० नुसार निश्चीत करण्यात आलेल्या प्रकरणांची छाननी करून केवळ त्याच प्रकरणी मंजुरी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. परिमंडल कार्यालयामार्फत लाड पागे समिती च्या शिफारसीनुसार नियुक्तीबाबतची प्रकरणे मुख्य कार्यालयातील मागासवर्ग कक्षास सादर करण्यात यावीत व मागासवर्गीय कक्षाकडून मंजुरी प्राप्त झाल्या त्यानंतरच संबंधित कार्यालयाने नियुक्ती देणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

६.	सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** वरील प्रमाणे

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः सफाई-२०१४/प्र.क्र.०७/महामंडळे**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

**वाचा —**

**१) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक, सफाई-२०११/ प्र.क्र.३२७/ विघयो-२, दि.२१ ऑक्टोबर, २०११**

**शासन परिपत्रक —**

लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर सूचना उपरोक्त दि.२१ऑक्टोबर,२०११ च्या परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या आहेत. तथापि,त्यानुसार कार्यवाही करतांना नियुक्ती प्राधिका-यांना अडचणी येत असल्याचे तसेच वारसा हक्काची प्रकरणे प्रलंबित राहत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१) उपरोक्त शासन परिपत्रक दि.२१ऑक्टोबर,२०११ मधील (१) (अ) ६ मध्ये " वरील १ ते ५ येथील कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफाई कामगाराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती " अशी सुधारणा याद्वारे करण्यात येत आहे.

२) सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगाराच्या वारसा हक्काच्या प्रकरणी कार्यवाही होवून नियुक्ती मिळण्यापूर्वी संबंधीत सफाई कामगारास वारस/नामनिर्देशनामध्ये बदल करावयाचा असल्यास त्या कामगारास वारस/नामनिर्देशनामध्ये बदल करण्याचा अधिकार राहील.

३) सफाई कामगाराच्या सेवानिवृत्तीनंतर संबंधितास वारसाहक्कानुसार नियुक्ती मिळण्यापूर्वी सफाई कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसा हक्कामध्ये बाधा येणार नाही. तसेच त्या कामगाराने

मृत्यूपूर्वी दिलेले संमतीपत्र ग्राहय राहिल आणि त्यानुसार त्याच्या वारसास/नामनिर्देशित व्यक्तीस नियुक्ती देण्यात येईल.

४) शासकीय/निमशासकीय कार्यालये,अनुदानित संस्था इ.मध्ये सन १९७५ पासून लाड-पागे समितीच्या शिफारशीच्या अंतर्गत वारसा हक्काच्या नियुक्तीची कार्यवाही सुरु असलेल्या प्रलंबित प्रकरणांमध्ये (दि.२१ ऑक्टोबर,२०११ पूर्वीच्या) अर्ज करण्याची मुदत लागू राहणार नाही. मात्र नविन प्रकरणांना वारसा हक्काच्या नियुक्तीकरीता अर्ज करण्याची मुदत शासन परिपत्रक दि.२१ ऑक्टोबर,२०११ नुसार सफाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त किंवा विकलांग झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाची राहिल. याबाबत असेही स्पष्ट करण्यात येते की, वारसा हक्काबाबत त्या कामगारास व त्याच्या कुटुंबास सविस्तर माहिती देण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहिल. तसेच नियतवयोमानानुसार निवृत्त/स्वेच्छानिवृत्त, मयत, वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या सफाई कामगाराच्या कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन आदेशात वारसा हक्काबाबतच्या तरतुदी स्पष्टपणे नमुद कराव्यात. जेणेकरुन कोणत्याही सफाई कामगाराचा वारस माहिती अभावी वारसा हक्कापासून वंचित राहणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२६१७५९०८६९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pratap Pandurang Lubal

Digitally signed by Pratap Pandurang Lubal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice &Spl Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pratap Pandurang Lubal
Date: 2014.02.26 18:03:07 +05'30'

(प्र. पां. लुबाळ)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई.

३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.

४. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

५. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई

६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग

७. महालेखापाल-महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर

८. महालेखापाल-महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञता) मुंबई/नागपूर

९. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई

१०. सर्व विभागीय आयुक्त

११. सर्व जिल्हाधिकारी

१२. संचालक,नगरपालिका प्रशासन,वरळी,मुंबई

१३. सर्व मा.आयुक्त,महानगरपालिका

१४. मुख्याधिकारी,सर्व नगरपालिका/परिषद

१५. आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे

१६. आयुक्त,अपंग संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

१७. संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण, पुणे.

१८. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१९. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण

२०. सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण

२१. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषदा

२२. व्यवस्थापकीय संचालक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.मुंबई

२३. व्यवस्थापकीय संचालक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,मुंबई

२४. व्यवस्थापकीय संचालक,संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,मुंबई

२५. व्यवस्थापकीय संचालक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,मुंबई

२६. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ,मुंबई

२७. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ,मुंबई

२८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई

२९. सर्व सहसचिव/उपसचिव/अवरसचिव/कक्ष अधिकारी, सा.न्या.व वि.स.विभाग,मंत्रालय,मुंबई

३०. निवडनस्ती,का-महामंडळे

**लाड समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत वारसा हक्काची अंमलबजावणी पुढे चालू ठेवण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः सफाई-२०१५/ प्र.क्र.२६८/ महामंडळे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
तारीख: ११ मार्च,२०१६

**वाचा :-**

**शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सफाई-२०१५/ प्र.क्र.२६८/ महामंडळे, दि.१० नोव्हेंबर, २०१५**

**प्रस्तावना :-**

१. महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, उदयोग उर्जा व कामगार विभाग क्र. एमएससी/ ८०४७१/ १२८४९८/ का.३ए दि.२० जून १९७२ अन्वये, सफाई कामगार व अस्वच्छ व्यवसायातील कामगारांच्या कामाबाबत व सेवांबाबत विचार करण्याकरीता श्री.लाड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासन निर्णय उदयोग, उर्जा व कामगार विभाग क्र.एमएससी १०७५/१७९०/कामगार-५, दिनांक १२/८/१९७५ अन्वये स्वीकृत करण्यात आल्या व या शिफारशींनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. लाड-पागे समितीने सफाई कामगारांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी नगर विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आणि या विभागाकडून वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले. त्यानुसार सफाई कामगारांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर, स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर किंवा शासन सेवा पूर्ण करण्यासाठी त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, मा.उच्च न्यायालयात नागपूर खंडपिठात श्री.नितीन गणेश चंद्रालिया व इतर यांनी राज्य शासनाच्या विरोधात रिट पिटीशन क्र.६१५५/२०१४ दाखल केली. त्यामध्ये राज्यात मोठया प्रमाणात असलेले बेरोजगार हे सफाई कामगारांच्या पदांसाठी स्पर्धेत असताना ४० वर्षापूर्वी सफाई कामगारांच्या मागण्यांसाठी करण्यात आलेल्या वारसा हक्क पध्दतीबाबतच्या लाड-पागे समितीच्या शिफारशी यापुढे चालू ठेवण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरहू समितीच्या शिफारशी नुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा पध्दतीने देण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबतच्या धोरणाचा पुनर्विचार करण्यात यावा, अशी विनंती मा.उच्च न्यायालयास केली. त्यानुसार मा.उच्च न्यायालयात या

विभागातर्फे शपथपत्र दाखल करुन लाड-पागे समितीच्या शिफारशी ह्या ४० वर्षापूर्वीच्या असल्या तरी सद्य:स्थितीत सदर शिफारशी चालू ठेवणे आवश्यक असल्याची भूमिका मांडण्यात आली. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा पध्दतीने देण्यात येणाऱ्या नियुक्त्या यापुढे चालू ठेवण्यात येणार आहेत किंवा कसे? याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय सहा आठवडयांच्या आत घेऊन शासनाचा निर्णय मा.उच्च न्यायालयास कळविण्याचे निर्देश दिले. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक १६सप्टेंबर,२०१५ च्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या संदर्भीय दिनांक १०.११.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तथापि, सदरहू शासन निर्णयात आढळुन आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संदर्भीय दिनांक १०.११.२०१५ रोजीचा शासन निर्णय रद्द करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

३. लाड समितीच्या शिफारशी नुसार सफाई कामगारांच्या वारसांना शासकीय/ निमशासकीय सेवेत देण्यात येणाऱ्या नियुक्ती संदर्भात पुनर्विचार करून संदर्भीय दिनांक १०.११.२०१५ रोजीचा शासन निर्णय रद्द करुन सुधारीत निर्णय खालीलप्रमाणे घेण्यात येत आहे:-

१) वाल्मिकी, मेहेतर समाजाला सामाजिक, आर्थिक संरक्षण देण्यासाठी सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत लाड समितीने शिफारस केलेली वारसा पध्दत पुढे चालू ठेवण्यात यावी.

२) लाड समितीच्या शिफारशी जरी ४० वर्षांपूर्वी लागू केल्या असल्या तरी सद्य:स्थितीत सदर शिफारशी चालू ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सफाई २०१४/प्र.क्र.०७/महामंडळे दि.२६ फेब्रुवारी २०१४ अन्वये घेण्यात आलेली भूमिका कायम ठेवण्यात यावी.

३) सफाई कर्मचारी म्हणून सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.

४) सदरहू निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफाई कामगारांच्या वारसांना लागू राहतील.

४. सर्व संबधित प्रशासकीय विभाग, शासकीय-निमशासकीय विभाग आणि सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी वरील निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

५. सफाई कामगारांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीकरीता पागे समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सविस्तर सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१११२२३१७९४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Haridas Wade

Digitally signed by Chandrakant Haridas Wade
DN: c=IN, o=SJ And SA, ou=Government Of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, cn=Chandrakant Haridas Wade
Date: 2016.03.11 15:39:37 +05'30'

**( चंद्रकांत ह.वडे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मंत्रालयीन विभाग,
७. महालेखापाल-महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर
८. महालेखापाल- महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
९. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. संचालक, नगर पालिका प्रशासन, वरळी, मुंबई
१३. सर्व महानगरपालिका
१४. संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इमाव व विशेष मागास प्रवर्ग संचालक, पुणे
१६. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१७. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
१८. सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकरी
१९. सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ जिल्हा परिषद
२०. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., मुंबई.

२१. व्यवस्थापकीय संचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या., मुंबई.
२२. व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई.
२३. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या., मुंबई.
२४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., मुंबई.
२५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या., मुंबई.
२६. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२७. ग्रंथपाल, वाचनालय, मंत्रालय, मुंबई.
२८. सर्व राजकीय पक्षांचे कार्यालय.
२९. निवडनस्ती (महामंडळे)

लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासन निर्णय / शासन परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०१८/प्र.क्र. २७/१६-ब(सी) ,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक :- १९ एप्रिल , २०१८.**

संदर्भ :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-१०७५/ ३४८ / (ओ) ११/सोळा, दिनांक १६ नोव्हेंबर, १९७६.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-१०७७/१५२२ / ११/सोळा, दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७.

३. शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी - २००२/ १९५२ / प्र.क्र. ६५ / २००२ / १६-ब, दिनांक०१ ऑक्टोबर, २००३.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२००२/ १९५२/प्र.क्र.६५/१६-ब, दिनांक २१ एप्रिल, २००६.

## शासन परिपत्रक

श्री. लाड व पागे समितीने आपल्या अहवालात मेहतर, वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी तत्कालिन परिस्थितीचा विचार करता विशेष शिफारशी केलेल्या आहेत. त्या शिफारशींच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व नगर विकास विभाग, या विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आदेशांचे / सूचनांचे शासकीय /निमशासकीय / महानगरपालिका / नगर परिषदा / मंडळे / महामंडळे / स्वायत्त संस्था / अनुदानित संस्था इत्यादींच्या आस्थापनेवरील कर्मचारी / अधिकारी या आदेशांची / सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत अनास्था दाखवित असल्याच्या तक्रारी येत असल्याने या विभागाने वेळोवेळी परिपत्रक / पत्र निर्गमित करुन या तक्रारींची दखल घेतलेली आहे. तरीसुध्दा अद्यापही सदर सूचनांची अंमलबजावणी होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

२. महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९ च्या पहिल्या अहवालातील शिफारशींवर विभागामार्फत दि. ०१.१०.२००३ ला शासन परिपत्रक काढले गेले होते. शासनास प्राप्त झालेल्या तक्रारी / निवेदनांची दखल घेऊन शासन खालीलप्रमाणे पुन्हा निर्देश येत आहे.

अ) लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय / निमशासकीय मंडळे / महामंडळे / स्वायत्त संस्था / महानगरपालिका / नगरपालिका / खाजगीसंस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर व वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्याच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते यापुढेही चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास सेवाप्रवेशातील नियम शिथिल करुन त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

ब) सफाईगार कर्मचाऱ्याच्या वारसास / जवळच्या नातेवाईकास नोकरी देताना शासकीय / निमशासकीय कार्यालयातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील जेष्ठता यादीतील केवळ मेहतर व वाल्मिकी या जातींच्या उमेदवारांची, त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे, तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्या आधारे त्यांची नेमणूक करण्यात येईल, यासंबंधी विशेष खबरदारी घेण्यात यावी.

क) मेहतर व वाल्मिकी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिची अनुसूचित जातींकरिता, वर्ग-४ मध्ये ज्या रिकाम्या जागा राखून ठेवलेल्या असतात, त्या जागांच्या संबंधात गणना करण्यात येणार नाही. त्यांची सरळसेवेने भरती करावी. मेहतर व वाल्मिकी यांच्या संख्येचा वार्षिक विवरणात दर्शविलेल्या वर्ग -४ च्या आकडयामध्ये समावेश होणार नाही. हे आकडे वार्षिक विवरणपत्रात स्वतंत्र प्रवर्गामध्ये दर्शविण्यात यावेत. वर्ग-४ च्या संबंधातील आकडयांमध्ये यांची संख्या समाविष्ट नाही, अशा अर्थाची टीप वार्षिक विवरणपत्राच्या शेवटी विनिर्देशपूर्वक समाविष्ट करण्यात यावी.

ड) मेहतर व वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी लाड व पागे समितीने केलेल्या शिफारशींवर समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, उद्योग, उर्जा व कामगार विभाग आणि नगर विकास विभाग यांनी वेळोवेळी शासन निर्णय / शासन परिपत्रक इत्यादी द्वारे आदेश / सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्यांचे पालन सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, तसेच मंडळे, महामंडळे यांनी ही करावी.

इ) सफाईगारांची, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर किंवा स्वेच्छा निवृत्तीनंतर रिक्त होणारी पदे व्यपगत करण्यात येऊ नयेत.

ई) सफाईगारांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शासनाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / परिपत्रक / सूचनांची अंमलबजावणी करण्यास शासकीय / निमशासकीय /महानगरपालिका / नगरपालिका /स्वायत्त संस्था इत्यादी आस्थापनेवरील कर्मचारी / अधिकारी हेतुपुरस्पर टाळाटाळ, कुचराई करतील त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०९३/६९७/१६-ब, दिनांक १२ जून, १९९५ अनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना या परिपत्रकाद्वारे पुन्हा एकवेळेस निर्देश देण्यात येत आहेत की, वरील बाबी त्यांच्या अधिपत्त्याखालील / प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना, कार्यालय प्रमुखांना, मंडळे/ महामंडळे/ महानगरपालिका/नगरपालिका/स्वायत्त संस्था/ अनुदानित संस्था इत्यादींच्या निदर्शनास आणाव्यात.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०४२०११४०५४०९०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2018.04.20 11:42:20 +05'30'

**( टि. वा. करपते )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति**

१. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
५. सर्व मंत्रालयीन विभाग
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१०. प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१३. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
१४. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१५. आयुक्त, सेवायोजन, मुंबई
१६. सहाय्यक आयुक्त(मागासवर्गीय कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्त्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख
१९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
२०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग, प्रशासकीय इमारत क्र. ०२, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पूर्व), मुंबई-४०००७१.
२१. निवड नस्ती.